# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/१०/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

## मौदा पोलिसांची रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. २५/१०/२०२४ रोजीचे पहाटे ०३/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, कुंभापुर शिवारातील कन्हान नदीचे पात्रात काही ट्रॅक्टर चालकांनी आप—आपले ट्रॅक्टर अवैद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुकी करीता नेलेले आहे. यावरुन त्वरीत पोलीस स्टेशन मौदा येथील अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार हे घटनास्थळी पोहोचले असता त्यांना एक स्वराज कंपनीचे विना नंबरचे ट्रॅक्टर चे ट्रॉली मध्ये रेती दिसुन आली. सदरहु ट्रॅक्टर चालक आरोपी नामे महेश ज्ञानदेव बावने, वय २३ वर्षे, रा. बोरी सिंगोरी, ता. पारशिवनी, जि. नागपुर यास त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर मधील रेती बाबत विचारले असता ट्रॅक्टर मालक राम नाकाडे रा. बोरी सिंगोरी याचे सांगणे वरुन रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याचे सांगीतल्याने सदरहु ट्रक्टर चालक व मालका विरुद्ध कलम ३०३(२), ४९ भा.न्या.स. सहकलम. ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीण महसुल अधिनियम सहकलम ४,२१ खाण आणि खनिजे अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

त्यानंतर त्वरीत पोलीस स्टेशन मौदा येथील अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार हे कुंभापुर शिवारातील कन्हान नदीचे पात्रात गेले असता कन्हान नदीचे पात्रातील दोन स्वराज कंपनीचे विना नंबरचे ट्रॅक्टर चे चालक त्यांचे ताब्यातील ट्रॅक्टर पात्रात सोडुन पसार झाले, यावरुन पसार झालेल्या ट्रॅक्टर चालका विरुद्ध ३०३(२) भा.न्या.स. सहकलम. ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीण महसुल अधिनियम सहकलम ४, २१ खाण आणि खनिजे अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम अन्वये वेगळा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरहू कार्यवाही मध्ये तिन स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर ट्राली सह किंमती २४,००,०००/—रु, व अंदाजे ३ ब्रास रेती कि. १५,०००/—रु. असा एकुन २४,१५,०००/—रु. चा माल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण, मा. श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान, यांचे मार्गदर्शणात श्री. प्रमोद घोंगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांचे सोबत पोलीस स्टॉप पोउपनि महेश बोथले, पोहवा संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, पोना दिपक दरोडे यांनी केली आहे.



## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ३२८/२१ कलम ३५४, ३५४(ड), ३७६(२)(एन) भांदवि सहकलम ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **आरोपी नामे— देशलाल संपत भलावी, वय २४ वर्ष रा. हॉटमेंट कॉलनी वाघोडा ता. सावनेर जि. नागपूर** हा राहण्यास असून दि. २०/०६/२०२४ रोजी ११/३० वा. फिर्यादीची अल्पवयीन मतिमंद मुलगी ही घराचे बाहेर गेली असतांना तिचा फिर्यादीने शोध घेतला नंतर ती १४.३० वा. मिळून आली. त्यावेळी तिचे अंगावरील कपडे फाटलेले होते तसेच कपडयांवर चिखल लागलेला असल्याने फिर्यादीने तिचेकडे विचारपूस केली असतांना पिडीताने सांगीतले की आरोपी याने तिला हॉटमेन्ट कॉलनी जवळ नाल्यापाशी नेवून जबरी संभोग केला तसेच पाठीवर मारहाण केली असे सांगितले. फिर्यादीची रिपोर्ट वरून गुन्हा नोंद करण्यात आला. नंतर पिडीतेला वैद्यकीय तपासणीसाठी मेयो रुग्णालय, नागपूर येथे पाठविले असता, तिचे सोबत बलात्कार झाल्याचे डॉक्टरांनी अभिप्राय दिल्याने फिर्यादीचे पुरवणी बयाण घेवून गुन्हयात कलम वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि सोनाली रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. डीजे ११ श्रीमती एस. एस. नागुर मॅडम यांनी दिनांक २५/१०/२०२४ रोजी वरील नमुद आरोपीस कलम ०६ पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/रू दंड,दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती सायखेडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा मधुकर आदमने यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**